31-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/30/2025 10:33 PM Page 1



## निवडक





उर्वी घाणेकर धृवी शिरोडकर भूमी तिळवे

### पणजीत आज 'बालिकांचे अरंगेत्रम' उद्या 'युवतीचे अरंगेत्रम'

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३०** : सिद्धकला डान्स इन्स्टिट्यूटच्या संचालिका तथा प्रसिद्ध नृत्यशिक्षिका जान्हवी बोंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली वयाच्या पाचव्या सहाव्या वर्षापासून भरतनाट्यम् चे शिक्षण घेणाऱ्या उर्वी घाणेकर व ध्रुवी अजित शिरोडकर या 'बालिकांचे अरंगेत्रम' शनिवार दि. ३१ मे रोजी संध्याकाळी ४ वाजता तर भूमी सुदेश तिळवे या प्रतिभाशाली 'युवतीचे अरंगेत्रम' रविवार दि. १ जून रोजी संध्याकाळी ३ वाजता कला अकादमीच्या मास्टर दीनानाथ मंगेशकर कला मंदिरात होणार आहे.

या तिघींना जान्हवी बोंद्रे यांचे कुशल मार्गदर्शन लाभले आहे व त्यांनी अनेक ठिकाणी कार्यक्रम करून दाद मिळवली आहे. उर्वी व ध्रुवी यांनी नृत्याची आंतरिक आवड, मेहनत, सराव याच्या जोरावर बाल वयात उत्कृष्ट नृत्याविष्कार घडवून अमाप कौतुक मिळविले आहे. अनेक स्पर्धा गाजविल्या आहेत. शाळेच्या अभ्यासात तेवढीच हुशारी दाखवून नृत्यात त्यांनी केलेली प्रगती लक्षवेधी आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर भरतनाट्यम मध्ये सुवर्णपदक पटकावलेल्या भूमीने गोव्याचे राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व केले आहे. तिचे शालेय शिक्षण कांदोळी येथील श्री सेंट तेरेझा हायस्कूल मध्ये तर उच्च माध्यमिक शिक्षण म्हापसा येथील पुरुषोत्तम वालावलकर उच्च माध्यमिक विद्यालयात झाले व सध्या ती मिरामार येथे धेंपे महाविद्यालयात बी ए करत आहे.

नृत्यदिग्दर्शनातही तिने कौशल्य दाखविले आहे.

### मडगावमध्ये तीव्र पाणीटंचाई

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३०** : मडगाव शहरातील अनेक परिसर गेल्या २४ तासांहून अधिक काळापासून गंभीर पाणीटंचाईला सामोरे जात असून, नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. जुन्या पाईपलाईनशी जोडलेल्या परिसरात काही प्रमाणात पाणीपुरवठा सुरु असला तरी, नव्या पाईपलाईनद्वारे पाणी मिळणाऱ्या भागांमध्ये पुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे.

या समस्येकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही फक्त अशाश्वती दिल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. विभागाने मंगळवारी संध्याकाळपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मध्यरात्री किंवा उद्या सकाळपर्यंतही पाणी मिळण्याची शक्यता कमी आहे.

या पार्श्वभूमीवर मडगाव काँग्रेस ब्लॉकचे संयोजक सॅव्हियो कुतिन्हो यांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींवर जोरदार टीका केली. मडगावमधील नागरिकांना २४ तासांहून अधिक काळ पाण्याविना राहावे लागत आहे, हे पूर्णतः अस्वीकार्य आहे. यापेक्षाही दुर्दैवी बाब म्हणजे स्थानिक लोकप्रतिनिधींचे मौन. आपत्कालीन परिस्थितीत पाणी पुरवणारे टँकर तरी कुठे आहेत? नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे इतक्या बेपर्वाईने दुर्लक्ष का केले जात आहे?असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

कुतिन्हो पुढे म्हणाले की, ८ मार्च २०२५ रोजी प्रशासनाने दिलेली आश्वासने केवळ पोकळ ठरली आहेत. यापुढे विलंब न करता सर्व बाधित भागांमध्ये तातडीने पाण्याचे टँकर पाठवण्यात यावेत, ही आमची ठाम मागणी आहे. मडगाव काँग्रेस ब्लॉकने सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्थानिक आमदारांनी तातडीने हस्तक्षेप करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे. तसेच सर्व नागरिकांना वेळेवर आणि न्याय्य पद्धतीने आवश्यक सेवा पुरवण्यात याव्यात, यावर त्यांनी भर दिला आहे.शहरातील ही पाणीटंचाईची परिस्थिती आणखी गंभीर होण्याआधी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी सध्या नागरिकांकडून होत आहे.

### हरमल, केरी मार्गातील धोकादायक झाडे हटवली



■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ३० : येथील पंचायत क्षेत्रातील हरमल, केरी तसेच मांद्रे रस्ता मार्गातील अडसर व धोकादायक झाडे पंचायत कडून तोडण्यात आल्याने वाहन चालकांनी समाधान व्यक्त केले.ह्यावेळी वीज खात्याचे कर्मचारी दुपारी उशिरापर्यंत कामात व्यस्त होते, ग्रामस्थानी त्यांचे कौतुक केले.

तिठा भागातील पिंपळ, वड, आंब्याचे तसेच बँक ऑफ इंडियनजीक असलेल्या शाळेच्या आवारातील धोकादायक झाडांची तोडणी केल्याने समाधान व्यक्त केले. तिठा येथील पिंपळ झाड अंत्यत जीर्ण झाले असून फांद्या तोडल्याने भार हलका झाला असला तरी बुंध्याचा भार रस्त्यात झुकल्याने कधीही अनर्थ घडू शकतो,असे मत नागरिकांनी व्यक्त केले.

दरम्यान, आठ मीटर रस्ता रुंदीकरणात, धोकादायक पिंपळ झाड हटविण्यात येईल अशी खात्रीलायक माहिती आहे.

या झाडांची तोडणी सरपंच अनुपमा मयेकर, उपसरपंच सोनाली माज्जि, पंचायत सदस्य सुशांत गावडे, संतान फर्नांडिस यांच्या देखरेखीखाली करण्यात आले.वीज खात्याचे अभियंते रामानंद पेडणेकर तसेच सचिव सुभाष कांबळी, हरेश मयेकर, पंचायत कर्मचारी गोपाल खवणेकर, प्रमोद गावडे, गजानन परब, मिनिन मशाडो, आदींनी सहकार्य केले.वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिस कर्मचाऱ्यांनी सेवा चोख बजावली.

दरम्यान, तिठा भागातील वीज वाहिन्या भूमिगत करण्याची मागणी होत असून लोंबकळणाऱ्या वाहिन्या व झाडांच्या फांद्यामुळे अघटीत घडण्याची भीती आहे.ह्या भागातील फांद्या तोडल्याने टॅक्सी,रिक्षा पायलट व्यावसायिक तसेच दुकानदारांनी समाधान व्यक्त केले आहे.

### ललितप्रभा वळवईतर्फे उद्या बाल आनंद मेळावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. ३०** : ललितप्रभा वळवईतर्फे तारी सोसायटी आणि श्री गजांतलक्ष्मी संस्थानच्या सहकार्याने आयोजित कै. उमाकांत वळवईकर स्मृती बाल आनंद मेळाव्याचा समारोप कार्यक्रम येत्या रविवारी १ जून रोजी संध्याकाळी ५ वा. वळवईतील तारी सोसायटी सभागृहात होणार आहे याप्रसंगी शेफाली नाईक आणि वैभव कवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली निर्मित 'गाणारा मुलूख' या द. मा. मिरासदार लिखीत बालनाट्याचे सादरीकरण होणार आहे. तरी सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

# आधी कोलवाचे प्रदूषण दूर करा! ग्रामस्थांची मागणी

## स्वदेश दर्शन २.० योजनेवर कोलवा ग्रामस्थांची सडकून टीका | पर्यटन प्रकल्पाला विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. ३०** : स्वदेश दर्शन २.० योजनेअंतर्गत कोलवा बीचचा कोस्टल टुरिझम सर्किटमध्ये समावेश करून त्याचा विकास केला जाणार आहे . मात्र, ही घोषणा म्हणजे जनतेच्या डोळ्यात निव्वळ धूळफेक असल्याचे स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी म्हटले आहे. त्यांनी कोलवा खाडीतील प्रदूषणासारख्या दीर्घकालीन आणि गंभीर समस्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याची टीका केली आहे.

कोलवा परिसरातील नागरीक आणि पर्यावरण प्रेमींनी म्हटले की, पर्यटन आणि पायाभूत सुविधांच्या विकासाच्या योजनांचे स्वागत असले तरी, त्या योजना केवळ वरवरच्या सौंदर्यीकरणापुरत्या मर्यादित आहेत. स्थानिक समस्या, विशेषतः सांडपाण्याचे व्यवस्थापन, रस्त्यांची खराब अवस्था, सार्वजनिक बागांचे दुर्लक्षण, आणि भटक्या कुत्र्यांचा त्रास याकडे कुणीच लक्ष देत नाही, अशी त्यांची नाराजी आहे.

कोलवा येथील स्थानिक रहिवासी सिमाव रॉड्रिग्ज यांनी यावर भाष्य करताना म्हटले की, हे फारच विरोधाभासी आहे की, सरकार समुद्रकिनाऱ्यांचे सौंदर्यीकरण करण्याच्या गोष्टी करते आहे, पण त्या किनाऱ्यालगतची खाडी मात्र अजूनही घाण, प्रदूषण आणि निष्क्रियतेच्या गर्तेत अडकलेली आहे. ते पुढे म्हणाले, आम्हाला विकासाच्या विरोधात काहीच नाही. पण आधी विद्यमान समस्यांवर तोडगा काढणं गरजेचं आहे. अन्यथा हे फक्त कोसळणाऱ्या भिंतीवर रंग चढवण्यासारखं आहे.

स्थानिकांनी ही बाबही अधोरेखित केली की, कोणताही विकास प्रकल्प राबवण्यापूर्वी त्याची माहिती नागरिकांसमोर मांडली पाहिजे आणि त्यांचाही सहभाग सुनिश्चित केला पाहिजे. अशा योजना प्रत्यक्षात आणण्यापूर्वी त्यांचे सादरीकरण लोकांसमोर करणे आवश्यक आहे. ग्रामस्थांना त्याबाबत माहिती मिळावी आणि त्यांना आपले मत मांडता यावे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे रॉड्रिग्ज यांनी स्पष्ट केले.

केळशी सरपंच आणि गोव्यातील लघु व मध्यम हॉटेल असोसिएशनचे उपाध्यक्ष डिक्सन वाझ यांनीही कोलवा बीचच्या विकासाआधी स्थानिक समस्या सोडवण्याचे आवाहन केले. एकेकाळी आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे प्रमुख आकर्षण असलेले कोलवा आज उपेक्षेच्या छायेत आहे, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, कोलवा खाडीच्या प्रदूषणाचा दीर्घकालीन परिणाम स्थानिक मच्छिमारांवर होत आहे. त्यामुळे कुठलाही विकास करताना या समस्यांना प्राधान्याने सोडवणे आवश्यक आहे.

वाझ यांनी सांगितले की, सरकारने कोलवा बीचच्या पुनर्विकासासंदर्भात पंचायत, हॉटेल मालक, टॅक्सी चालक, जलक्रीडा व्यावसायिक यांच्यासोबत चर्चा करणे आवश्यक आहे. तसेच, विकास योजनांचे तपशीलवार सादरीकरण होऊन त्यात पारदर्शकता असावी, अशी मागणी त्यांनी केली. स्वदेश दर्शन २.० अंतर्गत होणारा कोणताही विकास शाश्वत, समावेशक आणि स्थानिक समुदाय तसेच पर्यटक दोघांसाठीही फायदेशीर ठरावा, यासाठी खुल्या आणि पारदर्शक जनसल्ला घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## मंत्रिमंडळ फेरबदलावर तवडकर 'नो कॉमेंटस'

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३०** : राज्यातील मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चांना उधाण आले असताना, विधानसभा अध्यक्ष रमेश तवडकर यांनी या विषयावर कोणतेही मत व्यक्त करण्याचे टाळले आहे. मंत्रिमंडळातील कोणतेही बदल हे मुख्यमंत्री आणि सत्ताधारी पक्षाच्या निर्णयाधीन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

माध्यमांशी संवाद साधताना तवडकर म्हणाले की, मंत्रिमंडळ फेरबदलाचा निर्णय हा मुख्यमंत्री आणि पक्ष नेतृत्व घेतील. या संदर्भात माझ्याकडे कोणतीही टिप्पणी नाही. त्यांच्या या विधानामुळे फेरबदलाच्या अफवांना अधिकच जोर मिळाला असून, राजकीय वर्तुळात चर्चांना नवे वळण मिळाले आहे.

तवडकर यांनी त्यांच्या कार्यकाळातील विभागीय जबाबदाऱ्यांबाबतही स्पष्टता दिली. विशेषतः आदिवासी कल्याण विभागाच्या कामकाजावर काही वेळा निर्माण झालेल्या शंका त्यांनी फेटाळल्या. सर्व विभागीय कामकाज योग्य पद्धतीने व वेळेवर पार पडले आहे. अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधून प्रलंबित प्रकल्पांवर वेळेत निर्णय घेण्यात आला आहे, असे त्यांनी नमूद केले.

अलीकडे युनायटेड ट्रायबल असोसिएशन अलायन्स च्या कार्यक्रमात कला व संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांनी केलेल्या विधानांबाबत विचारले असता, अध्यक्ष तवडकर यांनी प्रतिक्रिया देण्याचे टाळले. गावडे यांच्या विधानांमुळे राजकीय वादंग निर्माण झाला असला तरी, अध्यक्षांनी त्यापासून स्वत:ला दूर ठेवले आहे.

विधानसभा अध्यक्ष या नात्याने माझ्या जबाबदाऱ्यांचे मी प्रामाणिकपणे पालन करत आहे. माझ्यावर सोपवण्यात आलेली भूमिका मला मान्य असून, मी संवैधानिक चौकटीत राहून कार्य करीत आहे, असेही तवडकर यांनी स्पष्ट केले. राज्यातील सद्यस्थिती पाहता, तवडकर यांची भूमिका राजकीयदृष्ट्या सावध असल्याचे स्पष्ट होते. मंत्रिमंडळ फेरबदल वा वादग्रस्त विधानांमध्ये सहभागी होण्याऐवजी त्यांनी प्रशासकीय कामकाज आणि संवैधानिक मर्यादांमध्ये राहून जबाबदारी पार पाडण्यावर भर दिला आहे.

## गोवा स्थापना दिन : स्थानिक दिग्गजांकडे दुर्लक्ष

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ रवींद्र भवनवर टीकेची झोड

▶ दक्षिण गोव्यात संताप

**मडगाव, दि. ३०** : गोवा राज्य स्थापनेच्या ६३ व्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर रवींद्र भवन, मडगाव येथे आयोजित कार्यक्रमांमध्ये गोव्यातील नामवंत सांस्कृतिक व्यक्तिमत्त्वांकडे दुर्लक्ष झाल्याबद्दल संताप व्यक्त होत आहे. गोवा एंटरटेनमेंट सोसायटी आणि गोवा सांस्कृतिक विकास समितीचे माजी सदस्य विशाल पै काकोडे यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत आयोजकांवर गंभीर आरोप केले आहेत.

विशाल पै काकोडे यांनी म्हटले की, राज्याच्या सांस्कृतिक इतिहासात मोलाचे योगदान देणाऱ्या चित्रपट छायाचित्रकार के. वैकुंठ, पद्मभूषण पुरस्कार प्राप्त चित्रकार लक्ष्मण पै आणि पद्मश्री व्यंगचित्रकार मारियो मिरांडा यांना त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राज्य स्थापना दिनाच्या कार्यक्रमांमध्ये महत्व न दिल्याने ही सांस्कृतिक वारशाची घोर अवहेलना झाली आहे. ही फक्त एक चूक नाही, तर गोव्याच्या सांस्कृतिक संपत्तीवर झालेला गंभीर अन्याय आहे, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे, या तिन्ही दिग्गजांच्या जन्मशताब्दीचा हा महत्त्वाचा वर्ष आहे. मात्र, त्यांच्या सन्मानार्थ ना कोणते प्रदर्शन आयोजित झाले, ना स्मृतिसभा, ना व्याख्यानमाला. याऐवजी, रवींद्र भवनने कर्नाटकातील ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या चित्रपटांचा समावेश असलेला चित्रपट महोत्सव साजरा करण्यास प्राधान्य दिले.

गोवा स्थापना दिन म्हणजे केवळ औपचारिकता नव्हे, तर आपल्या सांस्कृतिक ओळखीचे स्मरण करणारा दिवस असतो. अशा वेळी गोव्यातीलच कलावंतांचा सन्मान न करणे, ही मोठी चूक आहे, असे पै काकोडे म्हणाले. त्यांनी रवींद्र भवनचे अध्यक्ष राजेंद्र तालक यांच्यावरही टीका करत, हे गोव्यातील कलात्मक प्रतिभेचे सातत्याने होणारे दुर्लक्षण' असल्याचे नमूद केले.

या पार्श्वभूमीवर त्यांनी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक दामोदर मावजो यांना उद्देशून, श्याम बेनेगल महोत्सवात सहभागी होण्याऐवजी, अशा सांस्कृतिक अन्यायाविरोधात आवाज उठवण्याचे आवाहन केले.

फक्त श्रद्धांजली वा गौरवच नव्हे, तर सांस्कृतिक वारसा जपण्याच्या दृष्टीने रवींद्र भवनच्या कार्यप्रणालीवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दक्षिण गोव्यातील विद्यार्थ्यांसाठी दीर्घकाळापासून आश्वासित करण्यात आलेले संगीत, नृत्य आणि नाट्य प्रशिक्षण उपक्रम अद्याप सुरु न झाल्याबद्दल त्यांनी तीव्र असमाधान व्यक्त केले. या संस्थांनी त्यांच्या मूळ उद्दिष्टांवर भर द्यावा, अन्यथा सांस्कृतिक शून्यता निर्माण होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

शेवटी, सासष्टी तालुक्यातील आमदारांपासून ते सर्वसामान्य जनतेपर्यंत सर्वांना जागरूक होण्याचे आवाहन करत, पै काकोडे यांनी सांगितले की, गोव्यातील खऱ्या कलाकारांना पुढेही दुर्लक्षित होऊ द्यायचे नसेल, तर आता एकत्र येऊन आवाज उठवणे अत्यावश्यक आहे.

## गोविंद गावडे यांच्या समर्थनार्थ आदिवासींचा एल्गार !



■ टीम दैनिक हेराल्ड

▶ 'उटा' ने घेतली ठाम भूमिका

▶ आदिवासी समाजाने गावडेंच्या वक्तव्याचे केले समर्थन

**फोंडा, दि. ३०** : फोंड्यातील फर्मागुडी येथे घेण्यात आलेल्या एका तातडीच्या बैठकीत दोन हजारांहून अधिक आदिवासींनी एकत्र येत मंत्री गोविंद गावडे यांना ठाम पाठिंबा दर्शवला. अनुसूचित जमातीच्या मागण्यांसाठी आवाज उठवल्याबद्दल गावडे यांच्यावर टीका होत असतानाच, याला प्रतिउत्तर देत यूटीएए ने गावडे यांचे समर्थन जाहीर केले.

या बैठकीत बोलताना यूटीएएचे नेते प्रकाश वेळीप यांनी स्पष्ट केले की, २५ मे रोजी फोंड्यातील 'प्रेरणा दिना'च्या कार्यक्रमात गावडे यांनी केलेले पाच सेकंदांचे भाषण कोणत्याही प्रकारे आक्षेपार्ह नव्हते. ते म्हणाले, मंत्री गोविंद गावडे यांनी मुख्यमंत्री किंवा सरकारविरोधात कोणतेही अनुचित विधान केलेले नाही. त्यांनी केवळ अनुसूचित जमातींच्या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधले.

वेळीप यांनी जोर देऊन सांगितले की, गोविंद गावडे हे आदिवासी समाजाचे खरे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या भाषणाचा चुकीचा अर्थ लावून त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रयत्न हा राजकीय हेतूने प्रेरित आहे. सरकारला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असले तरी आदिवासींचा आवाज कुणीही दाबू शकत नाही.

ते पुढे म्हणाले की, या समाजाच्या अनेक मागण्या गेल्या २२ वर्षांपासून प्रलंबित आहेत. दोन एसटी तरुणांनी आंदोलनासाठी बलिदान दिले आहे. अशा वेळी आमचा संघर्ष अधिक दृढ झाला आहे. गोविंद गावडे यांना दोष देण्याचा कोणालाही नैतिक अधिकार नाही.

या बैठकीत आदिवासी नेते विश्वास गावडे यांनीही मंत्री गावडे यांच्यासोबत असलेल्या कटकारस्थानांवर प्रकाश टाकत सांगितले, गोविंद गावडे हे समाजहितासाठी लढणारे खरे नेता आहेत. त्यांच्याविरोधात शिस्तभंगाच्या नावाखाली त्यांचे नेतृत्व संपवण्याचा प्रयत्न होत आहे. माध्यमांनी त्यांच्या विधानाचा विपर्यास करून जनतेसमोर चुकीची प्रतिमा उभी केली आहे.

## मडगाव येथे ३९ वा गोवा राज्य स्थापना दिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३०** : ३९ वा गोवा राज्य स्थापना दिन मडगाव येथील रवींद्र भवन येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात गोव्याचा समृद्ध वारसा, युवा उत्कृष्टता आणि देशभक्ती भावनेवर प्रकाश टाकण्यात आला.

अक्षय अन्वेकर डान्स अकादमी च्या शक्तिशाली देशभक्तीपर सादरीकरणाने या उत्सवाची सुरुवात झाली. अलीकडील पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरभोवती थीम असलेली ही कला राष्ट्रीय लवचिकता आणि त्यागाचे चित्रण करते. मॉडेल मडगावने विशेषतः क्युरेट केलेल्या या सादरीकरणाने एक मजबूत भावनिक प्रभाव सोडला आणि या महत्त्वपूर्ण दिवशी योग्य श्रद्धांजली म्हणून प्रेक्षकांनी त्याचे मोठ्या प्रमाणात कौतुक केले.

कार्यक्रमाचे यजमान योगीराज कामत यांनी सर्व मान्यवरांचे आणि उपस्थितांचे स्वागत केले आणि युवा विकास, शिक्षण आणि सामुदायिक सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी मॉडेल मडगावच्या वचनबद्धतेची पुष्टी केली.

या कार्यक्रमाचे एक प्रमुख आकर्षण म्हणजे मडगाव मतदारसंघातील सुमारे २० शाळांमधील (गोवा बोर्ड, सीबीएसई आणि आयसीएसई) ८५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार. या विद्यार्थ्यांना २०२५ च्या एसएससी परीक्षेत त्यांच्या अपवादात्मक कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आले, ज्यामुळे गोव्यातील तरुणांची शैक्षणिक प्रतिभा आणि क्षमता दिसून आली.

गोवा राज्य नवोन्मेष परिषद आणि मनोविकास पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष जोस मॅन्युएल नोरोन्हा यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली. त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि राज्याचे भविष्यातील नेते म्हणून त्यांची भूमिका अधोरेखित केली. श्री नोरोन्हा यांनीही अव्वल चार क्रमांक पटकावणाऱ्यांचा सत्कार केला.

मडगावचे आमदार दिगंबर कामत यांनीही अनेक विद्यार्थ्यांचा सत्कार केला. त्यांच्या भाषणात त्यांनी तरुणांना मूल्ये आणि सामुदायिक जबाबदारीत दृढ राहून उच्च ध्येय ठेवण्यास प्रोत्साहित केले. या कार्यक्रमात भाटीकर इंग्लिश हायस्कूलच्या मुख्याध्यापिका मनीषा धुमे आणि रवींद्र भवन, मडगावचे उपाध्यक्ष मनोहर बोरकर यांचाही समावेश होता.